
# कोकणबाग

## कोंकणबाग ॲग्रोफार्म्स प्रा.लि.पुरस्कृत

फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम





TANGENT CONCEPTS
( EXCLUSIVELY MARKETED & PROMOTED BY)

नोंदणीकृत कार्यालयीन पत्ता : घर नं. ५९४, मु. पो. रायपाटण(बागवाडी),
ता. राजापूर, जि. रत्नागिरी. पिन-४१६ ७०४ | मोबा. ८२७५१३४७६२
अधिक माहिती-तपशील-नोंदणीसाठी मोबा. ९८२२२११८५६

Email - info@konkanbag.com | Web Site - www.konkanbag.com

| | |
|---|---|
| सोय सुविधा जागा जुने पडीक घर | क्षेत्रफळ – २२०० Sqm. झाडे संख्या - हापूस कलमे-४, फणस-४, देशी आंबे-३, प्राजक्त-२, चिकू-४, पेरू-२, कोकम-३, सागवान-२ |
| मोकळा भूखंड -१ (कोपऱ्यावरील भूखंड) | क्षेत्रफळ – १२०० Sqm. आईन झाडे -२, उंबर-१, सागवान-४ |
| मोकळी खुली जागा क्र. ०२ | क्षेत्रफळ – ३०००० Sqm. हापूस कलमे-१०, काजू -१०, सागवान - ५, |

| | |
|---|---|
| भूखंड क्र. ०४ | देशी आंबा-२ |
| भूखंड क्र. ०८ | हापूस-५, चिकू-२, पेरू-२ |
| भूखंड क्र. ११ | हापूस-२ |
| भूखंड क्र. १२ | नारळ-७, हापूस-२ |
| भूखंड क्र. १३ | नारळ-१५ |
| भूखंड क्र. १४ | हापूस-२, सागवान-१ |
| भूखंड क्र. १५ | सागवान-४, आईन-४, करवंद जाळी |
| भूखंड क्र. १६ | हापूस-८ |
| भूखंड क्र. १७ | झाडे संख्या – हापूस-८, सागवान-२, चिकू-४, पेरू-२ |
| भूखंड क्र. १८ | आर.सी.सी. शेड ४०x१२ फूट, विद्युत खांब-१ |
| सोय सुविधा जागा मागील भूखंड | देशी आंबा-१, सागवान-१, काजू-१ |

या प्लॉटपासून

1) राजापूर रोड स्टेशन– १२ किमी
2) सौंदळ (हॉल्ट) स्टेशन – २ किमी
3) विलवडे : १५ किमी,कोल्हापूर,राजापूर, राज्य महामार्ग क्रमांक १५० – ४ किमी आहे.
4) राजापूर रोड हे सौन्दळ जिल्हा महामार्ग पूर्णतः लगत.
5) रत्नागिरी : ७५ किमी, कोल्हापूर – ८२ किमी, पाचल बाजारपेठ – ८ किमी.
6) नियोजित प्रस्तावित तालुका रायपाटण – ५ किमी
7) नदी प्लॉट नंबर ९,१०,११,१२,१३ आणि open space

OWNERS PLOT BOUNDARY SHOWN AS

PROPOSED PLOT SHOWN AS

PROPOSED SUBDIVISION FOR AGRICULTURE PURPOSE
AT. AADAVALI ON PLOT BEARING S.NO. 102 Hi No.5 B
AT POST. AADAVALI
TAL. RAJAPUR, DIST. RATNAGIRI

OWNER SIGN -

SHOWN THUS

PLOT BOUNDARY
PROPOSED WORK
INTERNAL ROAD
EXISTING ROAD




| No. | AREA |
|---|---|
| 01 | 1200.00 sqm |
| 02 | 1200.00 sqm |
| 03 | 1200.00 sqm |
| 04 | 1200.00 sqm |
| 05 | 1200.00 sqm |
| 06 | 1200.00 sqm |
| 07 | 1200.00 sqm |
| 08 | 1200.00 sqm |
| 09 | 1200.00 sqm |
| 10 | 1200.00 sqm |
| 11 | 1200.00 sqm |
| 12 | 1200.00 sqm |
| 13 | 1200.00 sqm |
| 14 | 1200.00 sqm |
| 15 | 1200.00 sqm |
| 16 | 1200.00 sqm |
| 17 | 1200.00 sqm |
| 18 | 1200.00 sqm |
| TOTAL | 21600.00 sqm |
| RW.EX | 5100.00 sqm |
| SCR.R | 2500.00 sqm |
| PU.DE | 8000.00 sqm |
| OS | 4400.00 sqm |
| AMENI. | 4400.00 sqm |
| 7/12 | 46000.00 sqm |

कोंकणबाग

कोंकण बाग... निवांत निवास

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)

# कोंकणबाग निवांत-निवास प्रस्तावित सुविधा
# नियोजित विकसन आराखडा

## सामूहिक सुविधा

या प्रकल्पाच्या अंतर्गत सर्व सदस्यांना अखंडीत विद्युतपुरवठा व्हावा म्हणून १०० के. व्ही. क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसवला जाणार आहे. सर्व भूखंडांच्या रस्त्याच्या बाजूनेच विद्युतखांब असतील.

या प्रकल्पाच्या अंतर्गत भागात मध्यवर्ती भागात २२ फूटी व्यासाची लाल चिरा-बांधीव विहीर नियोजित असणार आहे. या विहीरीवरुन नळपाणी जोडणी प्रत्येक भूखंडापर्यंत असेल.

कोंकणबाग निवांत-निवास प्रकल्पाच्या सर्व भूखंडांना आतून परस्परांना जोडणारे विकसीत डांबरी रस्ते विकसकाकडून करुन दिले जातील.

सर्व /संपूर्ण भूखंडाला संरक्षणासाठी लाल जांभा दगडी कुंपण (बांध-संरक्षक भिंत) असणार आहे. या मुख्य कुंपणाच्या आतील भूभागाला/भूखंडाला सीमारेषेवरुन लाल जांभा दगडाचे एक थराचे आरेखन मिळेल.

या प्रकल्पाच्या अंतर्गत मालमत्तेच्या संरक्षणासाठी सुरक्षा, उत्पादित शेतमाल ग्राहकांना पुरवठा यासाठी स्वतंत्र सामंजस्य करारपत्रक करुन देखभाल.

प्रकल्पांतर्गत ब्रह्मेश्वर मंदिराचे वास्तूतज्ज्ञाद्वारे विकसन.

प्रकल्पांतर्गत कोकणी पध्दतीचे, वाडा प्रकारातील सामुदायिक सोयीसाठी सशुल्क विश्रामगृह.

TANGENT CONCEPTS
( EXCLUSIVELY MARKETED &
PROMOTED BY)

## कोंकणबाग

# कोंकण बाग... निवांत निवास

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)

**गंध कोकणमातीचा, त्याने आकाश कोंदले,**
**धरतीचे गंधगाणे निळया नभात गोंदले.**

**कवि कै. डॉ. विद्याधर करंदिकर**
(कणकवली, जि. सिंधुदुर्ग)

निसर्गसौंदर्याने नटलेल्या कोकण प्रांताची महती या ओळींनी अचूक सांगितली आहे. अशा मनमोहक कोकणांत आंबा, काजू, नारळ, मसालापीके, चिकू, चिंच, आवळा, शेवगा, रिठा, अननस, बांबू, कोकम अशा विविध फळपीकांसहीत हा प्रकल्प आकाराला येईल. कोकणात लांजा, दापोली, रत्नागिरी अशा काही तालुक्यात अनेक प्रकल्प आकाराला आले आहेत. मात्र ज्या जागा व प्रकल्प अगदी हायवेला लागून आहेत त्यांचे दर अगदी आकाशाला भिडणारे आहेत. या सर्वांचा विचार करुन मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीयांसाठी हा प्रकल्प आकाराला येत आहे. कोकणवासी होणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. या कोकणबागेचा प्रस्ताव समजून घेतल्यावर आपणाला या कोकणबागेत येण्याची तीव्र इच्छा होईल असा विश्वास विकासकाला वाटतो. या प्रकल्पातील नियोजित प्लॉटस् पाहिल्यावर आपणाला वाटेल...

''चला गडयांनो आपण सारे कोकणांत जावू, तेथील हिरवी गंमत-जंमत डोळे भरुनी पाहू.''

कवि श्री. रविकिरण पराडकर
(निवृत्त पोलीस उप अधिक्षक)

रत्नागिरी जिल्हयात, राजापूर तालुक्यात ओशीवळे या गावात ''विदिशा गार्डन्स'' मालक यांच्या संकल्पनेतून व नवजीवन ॲग्रो (रायपाटण, ता. राजापूर) यांचे तर्फे आम्ही कोकणात सर्वप्रथम व्यावसायिक तत्वावर स्ट्रॉबेरी लागवड केली. आज ५ वर्षानंतर कोकणात अनेकजण स्ट्रॉबेरी करत आहेत. अधिक विस्तृत माहितीसाठी संदर्भ पहा.

www.konkanbag.com



कोकणबाग

# कोंकण बाग... निवांत निवास

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)

## विकास आराखडा

- या ठिकाणी विकसीत करण्यात येत असलेल्या जागेवरील पीकांचे व योजनेतील फळबागेसाठी लागवडयोग्य झाडांचे उत्पादन, नफा-तोटा पत्रक, शासकीय अनुदान तक्ता याबाबत स्वतंत्र माहिती दिली जाईल.
- या प्रकल्पासाठी विकासक विविध जबाबदारींची काळजी स्वत: घेणार आहे. यामध्ये शासकीय नोंदी, सबसीडी अर्ज दाखल करणे, संबंधित मालकाच्या खात्यावर वर्ग करुन घेणे, महसूली कामकाज नोंदी, कामगार व्यवस्थापन, उत्पादनाच्या विक्रीसाठी मदत करणे आदी विविध सहकार्य विकासक खरेदीदाराला करील.
- या प्रकल्पासाठी कोकण कृषी विद्यापीठ, फलोत्पादन संस्था यांच्या संशोधनाचा आधार घेतला जाणार आहे. मात्र गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणूकीचा पुरेसा व किफायतशीर मोबदला मिळावा म्हणून काही काही व्यावहारीक निर्णय नफाक्षमता बघून घेतले जातील.
- या प्रकल्पासाठी जर गुंतवणूकदाराची परवानगी असेल तर विकासक कृषी पर्यटनासारखा उत्पादनक्षम अनोखा उपक्रम आयोजित करील.
- या प्रकल्पाच्या सुरक्षिततेसाठी घातले जाणारे कुंपण आर्थिकदृष्टया परवडणारे आणि नैसर्गिकदृष्टया सर्वश्रेष्ठ असेल. जैविक कुंपण नियोजीत आहे. जांभा चिरा, काटेरी कुंपण, दगडी कुंपण, सोलार कुंपण आदी विविध पर्यायांचा प्रस्ताव खरेदीदाराला दिला जाईल.
- निवांत निवास ही एक कल्पना गुंतवणूकदारांसाठी विकसीत करण्यात येत आहे. गुंतवणूकदार कायमस्वरुपी राहायला येवो, वा न येवो, त्याची गुंतवणूक सुरक्षित राहावी अशी योजना विकासकाकडून केली जाईल. खरेदीदाराच्या सांगण्यानुसार येथील निवासाचा विकास केला जाईल.
- विकासासाठी खरेदीदाराला सर्वतोपरी मदत केली जाईल. मात्र खरेदीदाराने स्वत:चा निर्णय स्वत: घ्यायचा आहे. विकासक स्वत: जागोजागी प्रत्येक टप्यावर गुंतवणूकदाराची पूर्वपरवानगी लेखी घेऊन त्यानंतरच विकासयोजना आकाराला आणण्यासाठी सुरुवात करील.
- या प्रकल्पासाठी कमीतकमी प्रत्येकी १२ गुंठ्यासाठी एक या प्रमाणात गुंतवणूकदार आवश्यक असतील, प्रत्येक खरेदीदार किंवा गुंतवणूकदार यांची किमान गुंतवणूक १२ गुंठे किंवा त्यापेक्षा जास्त असावी.

राजापूर तालुक्यात कोंकणबाग-निवांतनिवास या एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी गुंतवणूकदार आणि खरेदीदार यांना निमंत्रण आहे. या प्रकल्पात १२-१२ गुंठ्याचे क्षेत्राचे शेतीप्लॉट आणि कोकणी पध्दतीचे परंतु अत्याधुनिक सुखसोयींनी युक्त अशा फार्महाऊसची निर्मिती प्रत्येक १२ गुंठे प्लॉटवर असणार आहे.

कोकणबाग

# कोंकण बाग... निवांत निवास

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)

## पीकनिहाय उत्पादनक्षमता

- आंबा : आंबा बाग कोकणात अनेक प्रकाराने केली जाते. सरासरी उत्पादकता साधारणत: चौथ्या वर्षापासून काढली जाते. आपली पीक पध्दती रासायनिक नसेल तर आपण साधारण ७० ते ९० वर्षे चांगले उत्पादन घेऊ शकतो. चांगले झालेले आंबाकलम असेल तर आपण लागवडीच्या पहिल्या वर्षापासूनच अत्यंत अल्पप्रमाणात उत्पादन घेऊ शकतो. (हापूस, केशर, पायरी, माणकूर वगैरे) कलम प्रकार : भेट कलम, कोय कलम

- काजू : कोकणातील पांढरे सोने म्हणजे काजू. हंगामात रु. ९५/- ते रु. १४०/- प्रति कि. ग्रॅ. दर मिळवणारे हे पीक आहे. ओला काजूगर पहिल्या हंगामात रु. १५०० ते २००० रु. शेकडा भाव मिळवून जातो. पांढरा पॉलीश केलेला काजूगर १६०० ते २००० रु. दर मिळवतो. झाडाची उत्पादकता १ किलोपासून २० ते ३० कि. ग्रॅ. पर्यंत असते. वेंगुर्ला ४ ते ९ या लोकप्रिय जाती कोकण कृषी विद्यापीठाने विकसीत केल्या आहेत.

- बांबू : कोकणातील सर्वाधिक चलन देणारे हे पीक आहे. १२ ते १९ फूट चिवा काठी ३५ ते ४० रु. दराने विक्री केली जाते. पीकाची सुरुवात लागवडीपासून चौथ्या वर्षापासून होते.
  या पीकांबरोबरच कोकम, आवळा, चिकू, फणस मसालापीके आदी पीकांचा विचार आपण करु शकतो. कोकणातील लाल माती या पीकांसाठी उत्तम आहे.

- विविध पीके आपणाला जरी उत्पादनाच्या दृष्टिकोनातून खुणावत असली तरी आपली मशागतीची पध्दत काय व कशाप्रकारची आहे? सिंचन कसे करणार ? रासायनिक का सेंद्रीय ? अशा विविध बाजूंवर आपली नफाक्षमता अवलंबून असते. पारंपारीक पध्दती बदलून आता आपण हायटेक शेतीच्या वा संगणकीय शेतीसंचलन पध्दतीच्या जमान्यात वावरत आहेत. आपण आशावादी राहून गुंतवणूकीकडे पाहू शकतो.

आंबा, काजू, कोकम या पारंपारिक पीकांशिवाय आपण कोकम, नारळ, खैर,अननस, केळी, पपई, आले, शेवगा या नगदी पीकांचा (Cash Crops) विचार करु शकतो. जमीन खरेदीदाराने इच्छा व्यक्त केल्यास अनुभवी व तज्ज्ञ व्यक्तींकडून परिपूर्ण मार्गदर्शन दिले जाईल. आपल्या प्रकल्पासाठी अशा प्रकारची तज्ज्ञ मार्गदर्शक आमच्या कंपनीकडे उपलब्ध आहेत. पीक, पीकाची, झाडांची निवड, उत्पन्नाचे आकडे परिस्थिती, मशागत आणि व्यक्तीपरत्वे बदलतात.

हापूस फळांसह कलम | काजू-फणसांनी लगडलेले झाड | कोकम | काळीमीरी वेल | बांबू



(टीप- कलमांचे प्रकार, पीके, बाजारातील दर हे सध्याच्या चालू बाजाभावानुसार आहेत.
या परिस्थितीत व दरांत भविष्यात बदल होऊ शकतो याची नोंद घ्यावी)

कोकणबाग

# कोंकण बाग... निवांत निवास

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)

## कायदेशीर बाजूबाबत

विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या या जागेचे कागदपत्र स्वच्छ व सरळ (क्लीअर टायटल) आहेत. याशिवाय ज्या काही पूर्तता असतील त्यासाठी राजापूर येथील ख्यातनाम ॲड. सुरेश कृ. सिनकर, ॲड. मैत्रेय सिनकर आणि महाजनी असोसीएट (रत्नागिरी) या कायदा सल्ला सेवा फर्मची मदत घेतली जाणार आहे. / आवश्यक तेथे घेतली जाईल.

- विक्रीसाठी उपलब्ध असलेली जमीन बोजाविरहीत व मालकांकडे निर्वेध मालकी असलेली असेल.
- कायदाविषयक सल्लासेवा आपण काही रक्कम फर्मला टोकन देतेवेळीच केवळ ३ दिवसात आपणाला उपलब्ध होणार आहे. प्राथमिक छाननी विविधप्रकारे केलेली आहे. (नियम व अटी लागू)
- जागा खरेदी करीत असलेल्या खरेदीदाराकडून आवश्यक ती कागदपत्रे जागा नावे करण्यासाठी विकासकाकडून आगावू उपलब्ध केलेली आहेत.
- जागा खरेदी केल्यावर जमिनीचे मूळ खरेदीखत प्रत्येक खरेदीदाराला योग्य सही शिक्क्यांसह पुढील ७ दिवसांत लगेचच दिले जाईल. (निबंधकाकडे म्हणजेच रजिस्टरकडे योग्य ती स्टँपड्युटी भरुन केलेले खरेदीखत हा मालकीचा सर्वोत्तम पुरावा आपणासाठी असेल.)
- खरेदीदाराने आवश्यक तेव्हा खरेदीखत करण्यासाठी राजापूर येथे यावे लागेल. आपणाला १ दिवसाच्या मुदतीत खरेदीखत नोंदवून दिले जाईल. (प्रासंगिक अडचण, इंटरनेट सेवा ठप्प नसेल तर सर्व्हर डाऊन असणे, शासकीय अडथळा जसे निवडणूक कामकाज या बाबींमुळे विलंब होऊ शकतो, मात्र या संदर्भात विकसक पूर्वदक्षता घेऊनच नोंदणीसाठी बोलावणे करील.)

## शासकीय अनुदाने व लाभ

शासनाची रोजगार हमी योजना फलोत्पादनाशी जोडली गेली आहे. शेततळे, तुषारसिंचन, ठिबकसिंचन तसेच विविध प्रकारचे अनुदान दिले जाते. आपणाला लागवडीची योजना अंतीम झाल्यावर या सर्व अनुदानांसह आपल्या गुंतवणूकीचा एकत्रीत विचार व आढावा घेता येईल.

शासनाच्या विविध योजनांसाठी www.konkanbag.com या महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर खरेदीदार आणि गुंतवणूकदार यांना अधिकृत आणि खात्रीशीर माहिती मिळेल.

## उपयुक्त संकेतस्थळे

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

महाराष्ट्र शासन-कृषि विभाग | राष्ट्रीय फलोत्पादन मिशन

कोंकणबाग







# कोंकण बाग... निवांत निवास

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)

## गुंतवणूकीपूर्वी लक्षात घ्यावयाच्या बाजू

कोंकणबाग निवांत निवास नं. १ व २ या योजनांपैकी दोन्ही योजना कार्यरत असून स्वमालकीच्या ४ एकर तर अन्य, सभासदांच्या ९ एकर, ४ एकर, ३.५ एकर, १ एकर क्षेत्रासह सुरु आहेत.

कोंकणबाग नं. २ योजना ही कार्यान्वीत आहे. रत्नागिरी जिल्हयाबाहेरील सभासदांना काही महत्त्वाच्या या मार्गदर्शक सूचना -

- कोंकणबाग निवांत निवास प्रकल्पाचे नाव असेल.(आवश्यक तेथे गुंतवणूकदार हे नाव स्वतःसाठीच्या प्लॉटला वेगळे देऊ शकेल. उदा. पॅराडाईझ फार्म्स)
- जमीन खरेदी करुन सहभागासाठी येणाऱ्या सभासदांनी प्रथम जागा-जमीन पाहूनच मग निर्णय घ्यायचा आहे. निर्णय घेताना सर्व तपशिल समजावून घेणे बंधनकारक राहिल.
- निवांत निवास योजना : जमीन खरेदीसाठी इच्छुक सदस्याने स्वारस्य दर्शवल्यावरच प्रवेश, कारण ही सामूहिक योजना आहे. एकच मालक ५० ते ७० एकर खरेदी करीत असल्यास योजनेचा हेतू बदलू शकतो. (योजना नं. २ साठी ही अट लवचिकतेनुसार लागू)
- केवळ एकच मालक खरेदी करणार असेल तर त्याला आम्ही विकासकांनी निश्चित केलेल्या क्षेत्रालगत तशाप्रकारची जागा खरेदी करुन दिली जाईल. या जमिनीची कागदपत्रे, गाव नकाशा, ७/१२ उतारे, ८ अ, फेरफार आदी प्रक्रीया सभासदांचा सहभाग निश्चित होताच सुरु होतील.
- महसुली प्रक्रिया, सल्ला यासाठी विकासकांतर्फे निष्णात कायदेशिर सल्लागार नेमण्यात येईल. कायदेशीर सल्ला सेवा ॲड. सुरेश कृ. सिनकर (राजापूर) ता. जि. रत्नागिरी या फर्मतर्फे घेतली जात आहे.
- गुंतवणूकदाराने स्वतःची जागा, स्थळ निश्चित केल्यावर संबंधित जमीनमालकांकडून आणि शासनाकडील दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदीखत पूर्ण करुन दिले जाईल.(नियम व अटी लागू)


गणपतीपुळे


आडीवरे


राजापूर गंगा


श्री देव व्याडेश्वर मंदिर

कोकणबाग

# कोंकण बाग... निवांत निवास

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)

सभासद प्रत्यक्ष दाखल झाल्याच्या दिवसापासून मार्गदर्शनासह सहल आयोजन असेल. पुढील प्रकारच्या या सहली असतील -

- धार्मिक स्थळ भेट : गणपतीपुळे / पावस / गणेशगुळे / गुहागर / व्याडेश्वर / दुर्गादेवी इत्यादी.
- कोकण दर्शन : नियोजन करुन रत्नागिरी-सिंधुदुर्ग विविध किनारे व इतर पर्यटक स्थळे
- कृषिप्रकल्प अभ्यास सहल : बदलत्या कोकणाचे दर्शन व विविध नवे प्रकल्प, त्यासाठीची गुंतवणूक, आराखडा, उद्योजकांचे प्रकल्प व त्याच्या भेटी नियोजन यांच्या माहितीसह कृषिविद्यापीठ दापोलीसह कोकणातील ठळक मानबिंदु प्रकल्पांची भेट व माहिती.
- एकदिवसीय सहल : राजापूर दर्शन किंवा गगनबावडा- गगनगिरी दर्शन/कोल्हापूर-अंबाबाई (महालक्ष्मी) दर्शन (नजिकमार्गासह)
- हंगामी सहल : प्रकल्पभेट त्या-त्या हंगामात आंबाप्रकल्प किंवा काजूगर प्रकल्प भेट व परिचय व खरेदी.

(टिप : सहलीचे नियोजन प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी आल्यावर किंवा अगोदर सूचनेनुसार केले जाईल. प्रवास आराखडा, वाहन व्यवस्था, संबंधित ठिकाणचा निवास / भोजन आदी व्यवस्था आयोजक करतील. याबाबतीत सर्व पूर्वकल्पना घेतली जाईल.)
www.konkanbag.com



# कोंकण बाग... निवांत निवास

कौकणबाग

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)



## कोंकणबाग-निवांत निवास योजना नं. १

गंध कोकणमातीचा त्याने आकाश कोंदले
धरतीचे गंधगाणे निळ्या नभात गोंदले

- कै. कवीवर्य डॉ. विद्याधर करंदिकर
कणकवली, जि. सिंधुदुर्ग

कोकणप्रांताची महती या ओळींनीच नव्हे तर अनेक ठिकाणी लेखनातून-वाचनातून,प्रत्यक्ष प्रत्ययातून पटते. सुरुवातीला आपण ते वाचले असालच. या कोकणात मात्र आज जमिनीचे भाव वाढत आहेत. गणपतीपुळे, पावस, दापोली, गुहागर या ठिकाणी तर किंमती प्रचंडच आहेत. मात्र तरीही मध्यमवर्गियांपासून उच्च मध्यमवर्गाला कोकणनिवास, कोकणात जमीनीत गुंतवणूक आवाक्यात यावी, उत्पन्न घेता यावे या दृष्टिकोनातून गुंतवणूकदाराला आंबा, काजू लागवडीसह कोकणवासी शेतकरी बनवण्याची विस्तृत महत्त्वाकांक्षी अशी ही योजना आहे. मूळ कोकणवासी परंतु सध्या शहरवासी, महाराष्ट्रीयन कुटुंबाना यात प्रवेश असेल या योजनेच्या नियम, अटी व तपशिल पुढीलप्रमाणे असतील....

- ही विस्तृत योजना असून याठिकाणी १०० एकर जमीन घेण्याची तयारी करुन केलेली आहे. प्रत्येक सभासदाला शासनाच्या महसूली नियमानुसार कमीतकमी १२ गुंठे ते २ एकर जमीन घेणे बंधनकारक असेल.(महाराष्ट्र जमीन महसून अधिनियम १९६६ नुसार संदर्भ)
- खरेदी केलेल्या जमीनीवर फळबागा लागवड, वनौषधी लागवड किंवा शेतीतले नगदी पीक यापैकी कोणते उत्पादन कशाप्रकारे घ्यायचे याबाबतीत सभासदाला मार्गदर्शन केले जाईल. शासनाचे अनुदान (१००%) वा इतर सवलत योजना तसेच महसूली कागदपत्रांची पूर्तता, शेतसारा भरणा आदी गोष्टी सर्वतोपरीने विकासक करील. (आवश्यक तो करार करुन)
- जमीनीसाठी गुंतवणूक करु इच्छिणाऱ्या मालकाला स्वत:च विकसन करायचे असेल तर सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. (निवास, भोजन, गडीमजूर, पुरवठा, प्रवास सेवा वगैरे) सर्व खरेदी जमिनीला सामाईक कुंपण घातले जाईल. प्रत्येक सभासदाच्या संमतीने, पूर्वपरवानगीने त्याचे नियोजन केले जाईल.
- सुमारे १०० एकर जमीनीचा विकास करताना, प्लॉटस खरेदी प्रथम येणाऱ्यास दर्शनी,समोरचा प्लॉट अशाप्रकारे केला जाईल. प्रत्येक प्लॉटधारकाला लगतच्या मालकाला रस्ता रहदारीसाठी देणे बंधनकारक असेल. सर्वजण परस्परांना सहकार्य करतील अशाप्रकारे रचना केली जाईल.(शासनमान्य रेरा रजिस्टर प्लॉटींग)
- जमीन मालकाशी म्हणजेच गुंतवणूकदाराशी चर्चा करुन फळबाग पिक ठरवून घेतले जाईल. त्यासाठीच्या सबसिडीची कल्पना कृषिखात्याकडील अधिकृत माहितीनुसार दिली जाईल. (संबंधित गुंतवणूकदार ही माहिती संकेतस्थळावर पाहून घेऊ शकेल.) या ठिकाणी विकसीत करण्यात येणाऱ्या जमिनीवरील पिकांचे वा बागेचे उत्पादन-विक्री-नफा-तोटापत्रक याचा स्वतंत्र आराखडा करुन मुख्य विकासक व गुंतवणूकदार वेगळा M.O.U. करतील.

कोंकणबाग

# कोंकण बाग... निवांत निवास

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)

## निवांत निवास कोंकणबाग -१ - परिचय

या योजनेत सभासदाला सहभागी करुन घेताना त्याला आनंद व समाधान यांची देणगी देण्याचा प्रयत्न असेल. ही योजना कृषिपर्यटनावर आधारलेली आहे. प्रकल्पस्थळाबाबत माहिती म्हणजे या ठिकाणी पोचावे कसे ती स्वतंत्र दिली आहे.(संदर्भ: www.konkanbag.com)

विकासकाने स्वतंत्र चौसोपी घर, सुरेख शेणाने सारवलेली ओटीपडवी, माजघर, जिना, दुपदरी माळा, कडीपाट असा सरंजाम करुन, निसर्गरम्य परसदारासह निवांत निवास सजवला जाणार आहे. सभासदांचा प्रतिसाद जसजसा वाढत जाईल त्याप्रमाणात समोर असलेल्या विस्तृत मोकळया कसदार सुपीक जागेवर विविध प्रकारची शेती करण्याचा प्रकल्प तयार आहे. या योजनेची स्वतंत्र माहिती दिलेली आहे. (योजना नं. १ मध्ये १ रात्र २ दिवस, २ रात्री ३ दिवस अशी वर्षातून पॅकेजेस असतील.)

## सभासदाला मिळणाऱ्या सेवासुविधा

**अंमलबजावणीची वैशिष्टये**

या निवांत निवासात येताना सभासदाला सन्मान दिला जाईल. एकाचवेळी जास्तीत जास्त दोन ते चार कुटुंबानाच प्रवेश असेल. या योजनेत सहभाग निश्चित होताच निवास, आहारविहार, विविध स्थळदर्शन आदीबाबत पुढील रुपरेषा असेल.

- सभासदाला नजिकच्या रेल्वेस्टेशनवरुन किंवा महामार्गावरुन प्रकल्पस्थळी 'निवांत निवास' इथे आणण्यात येईल.
- निवासस्थानी स्नानादी व इतर आन्हिके आटोपून परिसराचा परिचय करुन दिला जाईल. (नदीवरील मुक्त स्नान पोहण्यासह उपलब्ध)
- निवांत-निवास या प्रकल्पस्थळी केवळ शुध्द-शाकाहारी भोजन मिळेल. कोकणी-महाराष्ट्रीयन पध्दतीचे, पारंपारिक सर्व पदार्थ मिळतील कोंकणबाग निवांत-निवास प्रकल्पस्थळावर फक्त शाकाहारी भोजनच असेल, मात्र मांसाहारी, मत्स्याहारी खवैय्यांना स्वतंत्र व्यवस्था अन्यत्र करुन दिली जाईल.

कौकणबाग



# कोंकण बाग... निवांत निवास

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)

- मुख्य विकासक विविध जबाबदाऱ्या सहकारी वर्गासह पार पाडील. शासकीय नोंदी, सबसिडी अर्ज दाखल करणे इतर महसूली कामकाज नोंदी तर दुसऱ्या बाजूला विकसन, कृषिव्यवस्थापन बांधकाम, पिकांची विक्री, कामगार व्यवस्थापन या सर्व जबाबदाऱ्या असतील.
- परस्पर सामंजस्य, नातेसंबंध असल्यास स्पष्ट करारपत्रक/वाटणीपत्रक करुन ४ ते ५ गुंतवणूकदार एक २ एकराचा प्लॉट घेऊ शकतील. (सदस्य संख्या गुंतवणूकदाराच्या मर्जीनुसार)
- विकासक पुढील सर्व गोष्टींची दखल, काळजी घेईल. तसेच तो त्याची कल्पना गुंवणूकदारांना देईल.
- मालकाच्या आवडीनुसार फळबागा वा विकसनाची योजना.
- प्रकल्पासाठी कुंपण जैविक (आवश्यक त्या ठिकाणी)
- ज्यांना या प्रकल्पावर घर वा शेतघर वा बंगला/ फार्महाऊस बांधायचे असेल त्यांना तशाप्रकारे विकसन करुन दिले जाईल.

कृषिपर्यटन क्षेत्र म्हणून MTDC ची मान्यता मिळवून या इथे कृषिसहली, कृषिकार्यक्रम आदींचे आयोजन केले जाईल.

या प्रकल्पात संपूर्ण प्रकल्पाला सामाईक सहभागाने कुंपण (चिरेबंदी-जांभा दगड) सामाईक सुरक्षारक्षक गेस्ट हाऊस (कौलारु कोकणी परंपरेसह ओटी पडवी माजघर या समवेत) या ठिकाणी गुंतवणूकदारांच्या नातेवाईक/ पाहुणे यांचीही सवलतीच्या दरात सोय केली जाईल.)

गुंतवणूकदाराला गुंतवणूकीचा पुरेपुर परतावा मिळावा म्हणून कृषितज्ज्ञांचा सल्ला -कृषिउद्योगात सहभाग - कृषिपर्यटनात सहभाग असे पर्याय उपलब्ध राहतील.

हा संपूर्ण प्रकल्प 'अॅग्रोसेझ - अॅग्रोटुरीझम' झोन म्हणून खास विकसीत केला जाईल. (कमाल मर्यादा १०० एकर)

---

नोंद : कोंकणबाग निवांत निवास नं २ प्रकल्प रत्नागिरी जिल्हयात राजापूर तालुक्यात -अर्जुना नदीकाठावर राजापूर तालुक्यात मुंबई-गोवा महामार्गापासून ७ ते ९ किमी अंतरावर राज्यमार्गालगत सौंदळ-कोळवण बागवेवाडी परटवली ओशीवळे या गावादरम्यान साकार होत आहे. (अधिक फोटो-www.konkanbag.com)

प्रकल्पस्थळ : आडवली गाव, ता. राजापूर, जि. रत्नागिरी -४१६ ७०४ पितांबरी अॅग्रो फार्म्र्ससमोर,
''कोंकणबाग अॅग्रोफार्म्स प्रा. लि.''
''निवांत-निवास''

# कोंकण बाग... निवांत निवास

कौकणबाग

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)



## ठळक वैशिष्टये - नियोजित योजना नं. २

- एकाच ठिकाणी वा एकाच अपार्टमेंटमध्ये वा परस्पर परिचयाचे ग्रुपने सभासद असतील तर स्वीटकॉर्न, ताजा भाजीपाला, केळी, इतर तत्सम फळे (चिकू, अननस, फणस, रामफळ, काजूबोंडे, भोपळा(लाल) करवंद, रातांबे) ग्रुपसाठी सोय करुन घरपोच दिली जातील.

- नाशिवंत नसलेली उत्पादने शक्यतो प्रत्यक्ष भेटीतून स्वत:च्या वाहनातून नेण्यासाठी दिली जातील. (उदा. कुळीथ, पावटा, तांदूळ, अमृतकोकम, आमसूल, रातांबातेल (कोकमजेल) शेंगदाणा, मूग, चवळी अखंड तूर, उडीद, कुळीथपीठ वगैरे)

- सर्व कृषिउत्पादने, पीके संपूर्णत: सेंद्रीय असतील. सभासदांना स्वत: शेतावर सर्व प्रक्रिया अनुभवता येईल पाहता येईल.)

- सभासदाला दिली जाणारी उत्पादने वा त्याने केलेली खरेदी त्याचा निवासखर्च, भोजनखर्च, वाहनखर्च वगैरेचा ट्रॅकरेकॉर्ड सभासदवहीत ठेवला जाईल. (संकेतस्थळावरुन ट्रॅकींग-कार्टींग वेबसाईट - www.konkanbag.com)

- गावरान गाईचे तूप, गोठवलेले लोणी यांच्या ऑर्डर्स आगाऊ द्याव्या लागतील. सभासदांच्या मागणी प्रमाणेच त्या पूर्ण केल्या जातील. (उदा. गायतूप, १ लि. हवे असल्यास १५ दिवस अगोदर नोंदवावे) सभासद संख्या भांडवली गुंतवणूक वाढल्यावर ही अडचण येणार नाही.

- वरील सर्व माल, वस्तू, कृषिउत्पादने यांचा बाजारभाव सतत बदलत असतो परंतु तरीही सभासदाची गुंतवणूक सहकार्य प्रकल्पाला भेटी आदी गोष्टी लक्षात घेऊन सवलतीच्या दरानेच पुरवठा केला जाईल. बाजारभावापेक्षा कमी दर लावून सभासदाच्या पूर्वपरवानगीने लेखी ऑर्डर वा तोंडी किंवा मेलने ऑर्डर घेऊन पुरवठयाचे बील अदा करुन घेतले जाईल. (यासाठी आमची स्वतंत्र वेबसाईट आहे. www.konkanbag.com)

- सभासदाला प्रत्यक्ष गुंतवणूकीचा निर्णय घेतल्यावर सविस्तर तपशिलवार योजना करारपत्रक दिले जाईल. त्यातील विविध प्राधान्यक्रम पाहून स्वत:चा निर्णय घ्यावा.

- कायदेशिरपणा, स्वच्छ व्यवहार, पारदर्शकता जपली जावी या हेतूने आवश्यक ती कागदपत्रे पूर्ण करुन घेतली जातील. मात्र सभासद व विकासक प्रकल्प संयोजक यांचा स्नेहभाव अतूट रहावा या हेतून कोकणस्नेही जपण्याच्या हेतूने या प्रकल्पाला प्रकल्पातील कृषिउत्पन्नाला मागणी देऊन घेऊन गुंतवणूक वसूल करुन घेण्याचा प्रयत्न व्हावा ही अपेक्षा.

# कोंकण बाग... निवांत निवास

कौकणबाग

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)





- या योजनेचा प्रामुख्याने भर कृषिउत्पादन विक्री कृषिमाल विक्री हाच असेल. सबब गुंतवणूकदाराने स्वत:सह इतरांना प्रवृत्त करावे तसेच स्वत: अनुभव घेऊन इतरांना ग्राहक या नात्याने प्रवृत्त करावे ही विनंती असेल.

- कोकणबाग निवांत निवास योजना नं. १ मधील सहभागी सभासदांना योजना नं. २ मध्ये प्राधान्य दिले जाईल.



- अनाकलनीय नैसर्गिक आपत्ती (उदा. यावर्षी २००८ मध्ये फाल्गुन-मार्च ला पडलेला मुसळधार पाऊस) आल्यास अंमजबजावणीत दोष निर्माण होऊ शकतो. चक्रीवादळ गोठयावर वीज कोसळणे, पुरामुळे वाहतूक ठप्प होणे अशाप्रसंगी सभासदांना व्यक्तिगत कळवले जाईलच परंतु यावेळी योजना काही प्रमाणात बिघडू शकते. (अशा घटना अपवादानेच घडतात तरीही Risk Factor म्हणून या घटना विचारात घेतल्या जाव्यात. covid-19 कोरोना, नोटाबंदी हेही Risk Factor आहेत.)
- सभासदांना प्रकल्पस्थळाला केव्हाही भेट देता येईल मात्र निवास वा इतर व्यवस्था हवी असेल तर पूर्वकल्पना द्यावी लागेल. (कमीतकमी १२ तास ते जास्तीत जास्त २ दिवस)
- योजनेतला सहभाग रद्द करायचा असल्यास तर कमीतकमी सहा महिने आगाऊ कल्पना लेखी देऊन, प्रमाणपत्र देऊन सहभाग समाप्ती घोषित केली जाईल.
- योजनेत सहभागी असताना प्रकल्पाच्या अधिक समृध्दीसाठी कोणत्याही सूचना असल्यास त्यांचे व्यवहार्यतेनुसार स्वागतच केले जाईल.
- सभासदांची गुंतवणूक रक्कम गुंतवण्यासाठी विकासकाने प्राधान्यक्रम ठरवलेले आहेत. मात्र तरीही गुंतवणूकदाराला पारदर्शकतेच्या हेतूने माहिती मागण्याचा, पाहण्याचा हक्क लेखी दिला जाईल. गुंतवणूक उत्पादक उद्योगात, नगदी स्वरुपाच्या पिकात गुंतवली जाईल. त्याबाबतीत गुंतवणूक विनीयोग उत्पन्न आराखडा गुंतवणूकदाराला मागवता येईल.
- कोकणविकास या संकल्पनेसाठी कटीबध्द होत त्यादिशेने संघटीत होण्यासाठी गावाकडेच राहणाऱ्याला रोजगार उद्योग मिळावा अन् शहरवासियांना हक्काचे विश्रांतीस्थान मिळून कोकणस्नेहाचा प्रेमाचा ब्रिज तयार व्हावा हा प्रमुख हेतू या योजनेत आहे.

कोकणबाग

# कोंकण बाग... निवांत निवास

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)

## येवा ! कोकण आपलाच आसा !
## या-पहा-खात्री करा, अनुभव घ्या मगच निर्णय घ्या !









शहरातील जमीन घेणारा माणूस काहीसा भांबावलेला असतो. प्रत्येकाला कायदेशीर सल्लागार छोट्याशा जागेच्या व्यवहारासाठी परवडत नाही व ते अपेक्षितही नसते. आपण कष्टाने कमावलेली लक्ष्मी-धन योग्य त्या प्रकाराने गुंतवले जावे यासाठी आम्ही आपणाला आमच्या कोकणबाग-ॲग्रोफार्म प्रा. लि. या फर्मतर्फे आपल्या सेवेसाठी कार्यरत असू. आपणाला अनेक व्यक्तींची व्यवहारात वा जमीन खरेदीत झालेली फसवणूक वर्तमानपत्रात वाचनात येते तेव्हा आपण साहजिकच विचलीत होतो व साशंक होतो. यासाठीच कोकणात कार्यरत असलेली आमची कंपनी आपणाला सहकार्य करील. प्रतिवर्षी करावयाची कायदेशीर व महसूलविषयक कामे, गडी, मजूर, शेतीची कामे आदी सारी मदत आमच्या फर्मकडून आपणाला मिळेल. एकूणच गुंतवणूकदाराला सुखकारक व फायदेशीर अशा गुंतवणूकीसह परिपूर्ण पध्दतीने सुखावह ठरेल अशा प्रकारचा अनुभव घेण्यासाठी आपणाला कोकणबाग- निवांतनिवास हा सर्वोत्तम पर्याय आहे.

**|| शुभं भवतु....||**

| | |
|---|---|
| श्री. मंदार रघुनाथ उपाध्ये<br>सौ. मृण्मयी मंदार उपाध्ये<br>पुणे क्षेत्र ८ एकर वनशेती | श्रीम. स्मिता वसंत शेंड्ये (पुणे)<br>क्षेत्र ४ एकर (हापूस व बांबू बाग) |
| श्री. मिलिंद परांजपे (ठाणे)<br>क्षेत्र १२ एकर, फलोत्पादन<br>परांजपे गार्डन्स | श्री. अमिताभ अय्यर<br>सौ. कश्मिरा अय्यर<br>पॅराडाईझ फार्म्स (चांदिवली, मुंबई) |
| | विदिशा गार्डन्स (फेज -१ व २)<br>एकूण क्षेत्र - ८ एकर |

# ग्राहकांचे अभिप्राय

## विदिशा गार्डन १ आणि विदिशा गार्डन २-ठाणे स्थित मालक

आम्ही २०१३ च्या सुमारास नवजीवन ॲग्रो सपोर्ट सर्व्हिसेस अँड कन्सल्टन्सी (म्हणजेच आताची कोकणबाग ॲग्रो फार्म्स प्रायव्हेट लिमिटेड) यांचे कडून सर्व प्रथम ४ एकर आणि त्यानंतर ३ एकर ६ गुंठे जागा अशी एकूण आता पर्यंत एकूण ७ एकर ६ गुंठे' जागा व्यवसायिक फलोत्पादनासाठी खरेदी केलेली आहे. जागेच्या खरेदीपासून ते आज पर्यंतच्या विकसनाच्या विविध टप्प्यावर आम्हाला कोंकणबाग कडून विविध प्रकारचे सहकार्य मिळाले.

सध्या आमच्या फार्मवर वेंगुर्ला ७ काजू ४०० झाडे, नारळ-२००, हापूस, जायफळ, दालचिनी अशी शेती केलेली आहे. आमच्या दोन्ही फार्म वर कामगारांसाठी सर्वोत्तम सुविधा असलेली व्यवस्था आहे. आम्ही इंद्रायणी व आंबेमोहोर या तांदळाचे उत्तम उत्पादनही घेतलेले आहे. Strawberry उत्पादन कोकणात सर्वोत्तम पद्धतीने घेवून उत्पादनाचा एक विक्रम विद्यापीठानंतर आम्ही सर्व प्रथम कोंकणबागच्या मदतीने केला आहे. कोंकणबाग सर्वोत्तोपरी सहकार्याबद्दल आम्ही परिपूर्ण समाधानी आहोत. कामगार व्यवस्थापन देखील या कोंकणबाग परिवाराने आम्हाला पुरवले आहे. तसेच काकडी, झेंडूची फुले याचे देखील विक्री उत्पादन आम्हाला कोंकणबाग यांनी पुरवले.

## युगंधरा गार्डन

श्री. मधुसुधन गणेश बापट, डोंबिवली, ठाणे, श्री. प्रशांत मधुसुधन बापट (नोकरीनिमित्त डेन्मार्क इथे), श्री. शशांक मधुसुधन बापट (नोकरीनिमित्त दुबई इथे) या कुटुंबियांच्या या युगंधरा गार्डन्स या अडीच एकर जागेत सुमारे १२६ हापूस कलमे आहेत. अवीट चवीच्या मधुर हापूसची ही बाग असून या बागेतील पाहूस फळे सर्व महाराष्ट्रभरात चोखंदळ खवय्यांच्या पसंतीला उतरली आहेत. या बागेचे व्यवस्थापन नवजीवनकडे आहे.

## श्रीम. स्मिता वसंत शेंड्ये– पुणे (सध्या नोकरीनिमित्त भोपाळ इथे)

मी बागवाडी इथे १ एकर ज्यामध्ये हापूस आंबा कलमे– ३८ आहेत. तसेच ओशिवळे इथे २ एकर ११ गुंठे ज्यामध्ये मी बांबू फार्म– सोनचिवा, माणगा यासारखी अभिनव फार्म कोंकणबाग च्या मदतीने तयार केले आहे. मी आणि माझी मुलगी भोपाळ एवढ्या दूर असूनही माझे फार्म उत्तम प्रकारे व्यवस्थापन कोंकणबाग च्या मदतीने केले आहे. या सहकार्याबद्दल मी त्यांना नेहमीच कोंकणबाग ला धन्यवाद देत आले आहे.

## श्री. मंदार रघुनाथ उपाध्ये व सौ. मृण्मयी मंदार उपाध्ये

आम्ही कोंकणबाग यांचे माध्यमातून एकूण ७ एकर जागा खरेदी केलेली आहे. तसेच या जागेवर वन शेती करण्यासाठी आम्ही कोंकणबाग परिवारासोबत प्रक्रिया चालू आहे.





# कोंकण बाग... निवांत निवास

(फार्महाऊसधारक- कोकणवासी कृषिउद्योजक-कृषिउत्पादक-
नियमित कोकण पर्यटक होण्याचा अभिनव उपक्रम)

## पर्याय १

आपणाला जमीन खरेदी झाल्यानंतर विकसनाच्या विविध अशा पर्यायांसाठी ''नवजीवन ॲग्रो सपोर्ट सर्व्हीसेस ॲन्ड कन्सल्टन्सी'' या आमच्या सल्ला सेवेची मदत घेता येईल. कृषीविकास, फलोत्पादन, कृषीपर्यटन, निवांतनिवास आदी विविध पर्याय आमच्या ग्राहकांना सुचवले जातील. 'नवजीवन ॲग्रो सपोर्ट' आपणाला आवश्यक तेथे सहकार्य, मदत, पाठिंबा, मजूर पुरवठा आदी मदत करील. आपणाला फक्त खालील दोन गोष्टी करायच्या असतील.

- आपल्या प्रकल्पासाठी लागणारी आर्थिक तरतूद करणे.
- आपल्या प्रकल्पस्थळी वेळोवेळी भेट देणे व देखरेख आणि समन्वय साधून संवाद साधणे.

## पर्याय २

आपण खरेदी केलेल्या जमिन जागेचा विकास स्वतःचा स्वतः करणे. आपण ''नवजीवन ॲग्रो सपोर्ट सर्व्हीसेस ॲन्ड कन्सल्टन्सी'' माध्यमातून खरेदी केलेली जागा आपण स्वतःच आपल्या कोणी परिचित अथवा अन्य एजन्सी, कंत्राटदार अन्य यंत्रणेमार्फत यांचेकडून जर विकसीत करणार असाल तर आम्ही आपणाला या प्रक्रियेत आवश्यक तेथे आपल्या विनंतीनुसार सहकार्य करु अशाप्रकारचे सहकार्य हे आपली विनंती, आपल्या यंत्रणेची आवश्यकता या दोहोंशी समन्वय साधून आवश्यक असेल तरच सहकार्य मदत केली जाईल.

## पर्याय ३

आम्ही आपण खरेदी केलेल्या जमिनीचा विकास आणि उत्कर्ष करु. आपण खरेदी केलेली जमीन आम्ही भाडेकरारावर घेऊ. आपणाला वार्षिक तत्वावर भाडे दिले जाईल. आपण जमिनीचे मालक असाल. आम्ही या जमिनीवर काही नगदी पीके (Cash Crops) घेऊ. आपल्या जमिनीवर तोंडी, लेखी वा अन्य कोणत्याही कराराने किंवा अन्य कोणत्याही मार्गाने कर्ज उभारले जाणार नाही. आपण फक्त जमिनमालक असाल. विकसक आम्ही नवजीवन ॲग्रो सपोर्ट ही फर्म असेल. कमीतकमी ३ वर्षे व पुढे ५ वर्षे, ७ वर्षे, ९ वर्षे व जास्तीत जास्त ११ वर्षे खंडित होणारा व नूतनीकरण होणारा करार करुर आम्ही या जमिनीचा विकास करु. या पर्यायात कुंपणखर्च आपला असेल विहिर किंवा पाणी विद्युतजोडणी या गोष्टी परस्पर चर्चेने ठरवून घेतल्या जातील.

## पर्याय ४

जमिन मालक तुम्ही - विकसक आम्ही !

आमच्या लोकप्रिय सर्वांना पसंत पडलेल्या पर्यायांपैकी हा एक पर्याय. आपण जमिन खरेदी करताच तुम्ही ७/१२ सदरी मालक व्हाल. आपण खरेदी केलेल्या जमिनीचे विकसन करुन देण्याची जबाबदारी आमची असेल. या प्रकारात आपली जबाबदारी आणि नवजीवन ॲग्रो सपोर्ट सर्व्हिसेसची भूमिका पुढीलप्रमाणे असेल.

- आपण जमिन मालक या नात्याने नवजीवन ॲग्रो सपार्ट सर्व्हिसेस ॲन्ड कन्सल्टन्सी फर्मशी आपल्या जमिन विकसन कल्पना खरेदीवेळी, त्यानंतर विकसनाच्या प्रक्रियेत वेळोवळी चर्चेने व संवादाने सादर कराव्यात.
- नवजीवन ॲग्रो सपोर्ट आपणाला आपल्या जमिनीच्या विकासाचा परिपूर्ण आराखडा, अंदाजपत्रक, लागणारा वेळ, विकसन व पिके याबाबतीत वेळोवेळी संपर्क, संवाद साधून आपल्या जमिनीला उत्पादक बनवून देईल व परिपूर्ण विकास करुन देईल.

## शेतकरी उत्पादक कंपनी

# कोंकणबाग ॲग्रो टुरीझम फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि.

भारत सरकारच्या धोरणानुसार बचत गटांच्या चळवळीइतकेच शेतकऱ्यांच्या कंपनीला महत्व देण्याचे धोरण शासनाने अवलंबलेले आहे. या धोरणानुसार आम्ही कोंकणबाग कंपनी स्थापन केलेली आहे. आमची कंपनी हापूस आंबा, नारळ, काजू, कोकम या हंगामी फळांच्या व्यापावासाठी व खरेदी विक्रीसाठी राज्यभरात प्रसिद्ध आहे. कोकणातील कोकण मेवा ''मायको फुड्स'' या ब्रॅंडने देश भारत विकला जातो.

आमच्या या कोंकणबाग कंपनीला १७ जुलै २०२० रोजी भारत सरकार कंपनी मंत्रालय विभाग यांच्याकडून मान्यता मिळालेली आहे. कंपनी रजि. नं. U0112PN2020PTC192073, PAN NO. KLPK03327C, TAN NO. AAICK1717H या तीनही परवानग्या मिळाल्या असून कंपनी कायद्याने अस्तित्वात आलेली आहे.

मंडळी कोकणातील आपल्या कोकण मेव्याच्या सर उत्पादनांना बाजारात प्रचंड मागणी आहे. आपण शेती नाही मोती पिकवत आहोत. आपण कोकणातील लाल मातीत पिवळ सोन पिकवत आहोत. आमचं पांढर सोन म्हणजे काजू गर आणि पिवळ आणि लाल केशरी सोन म्हणजे आपला हापूस आंबा. पण याला म्हणावी तशी खात्रीची बाजारपेठ, टिकाऊपणा, सुविधा नसल्यामुळे आपले हे सोन मातीमोल होत आहे आणि ते उघड्या डोळ्यांनी नाईलाजाने बघावं लागत आहे हे आमचं भळभळत दुख आहे. फक्त यासाठीच नियोजनबद्ध योजना हवी आणि त्यासाठी योग्य ते मार्गदर्शन हवे. नेमकं हेच सगळं पुरविण्याचा प्रयत्न आपली कंपनी खास आपणासाठी करणार आहे. चला एकत्र येऊया ! एकत्र मिळून बंधुभावाने पुढे जाऊया ! प्रगती करूया!

COMPANY DETAILS

**KONKANBAG AGRO TOURISM FARMERS PRODUCER COMPANY LIMITED**

REG. NO. : U0112PN2020PTC192073,

PAN NO. : KLPK03327C | TAN NO. : AAICK1717H

COMPANY ADDRESS : मु. पो. रायपाटण बागवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

OFFICE ADDRESS : मु. पो.पाचल, टेलीफोन एक्स्चेंज शेजारी पाचल, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

# उत्पादने

- करवंद सिरप — १ ली.
- करवंद सिरप — १ ली.
- करवंदवडी — १०० ग्रॅम
- कोकम आगळ — १ लि.
- कोकम सरबत — १ लि.
- कोकम सरबत — ५ लि.
- कोकम तेल
- कुळीथ पीठ — २०० ग्रॅम
- कुळीथ पीठ — २५० ग्रॅम
- कुळीथ पीठ — १ कि. ग्रॅ.
- मँगो जॅम — २०० ग्रॅम
- मँगो जॅम — ५०० ग्रॅम
- मँगो प्लप ३ — १ कि. ग्रॅ.
- मँगो प्लप — ८५० ग्रॅम
- मेतकूट — ५० ग्रॅम
- मोरावळा — ५०० ग्रॅम
- नाचणी सत्व (शुगर फ्री)
- नाचणी सत्व (शुगर)
- पाचक — २०० मिली
- पाचक — ५०० मिली
- फणस पोळी — १०० ग्रॅम
- फणस सांदण — ३०० ग्रॅम
- सांडगी मिरची — ५० ग्रॅम
- तळलेले गरे — १०० ग्रॅम
- तळलेले गरे — २५० ग्रॅम
- अनपॉलिश डायट राईस — १ कि. ग्रॅ.
- अनपॉलिश डायट राईस — ५ कि. ग्रॅ.

- आंबा लोणचे — १ कि. ग्रॅ.
- आंबा लोणचे — २०० ग्रॅम
- आंबा लोणचे — ५०० ग्रॅम
- आंबा मावा — २५० ग्रॅम
- आंबा मावा — ५०० ग्रॅम
- आंबा मोदक — २५० ग्रॅम
- आंबा पल्प — १ लि.
- आंबा पल्प — ७५० मिली
- आंबा पोळी — १०० ग्रॅम
- आंबा सिरप — ५०० मिली
- आंबा वडी — २५० ग्रॅम
- आंबे हळद लोणचे — २०० ग्रॅम
- आमसूल — २५० ग्रॅम
- आवळा ज्युस — ५०० मिली
- आवळा मावा — १०० ग्रॅम
- आवळा पेठा — १०० ग्रॅम
- आवळा सुपारी — ३० ग्रॅम
- आवळा सरबत — १ ली.
- आवळा सरबत — ५ ली.
- मँगो छुंदा — २०० ग्रॅम
- फणसपोळी — १०० ग्रॅम
- शेंगतेल — १ लि.
- शेंगतेल — ५०० मिली
- आंबा मुरांबा — ४०० ग्रॅम
- कैरी पन्हे — १ ली.
- कैरी पन्हे — ५ ली.
- काजू मोदक — २५० ग्रॅम



कोंकणबाग

# KONKANBAG AGROFARMS PRIVATE LIMITED

Company Registration No. : U01110PN2020PTC193058,

PAN : AAICK2395M | TAN : KLPK03340B | GST NO.27AAICK2395M1ZX




**श्री. महेश लक्ष्मण पळसुलेदेसाई**

संचालक



**सौ. मृण्मयी गजानन पळसुलेदेसाई**

संचालिका



**श्री. हेरंब सहस्त्रबुद्धे**

प्रमोटर

**BANK DETAILS**

ACCOUNT NAME - KONKANBAG AGROFARMS PRIVATE LIMITED,

ACCOUNT NUMBER - 173205006338

BANK NAME - ICICI Bank | BRANCH - RAJAPUR,

IFSC CODE - ICIC0001732 | ACCOUNT TYPE - CASH CURRENT

**TANGENT CONCEPTS**

(EXCLUSIVELY MARKETED & PROMOTED BY)

कोंकणबाग